**ISSN 2277 - 5730**

**AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL**

# AJANTA

**Volume - X** **Issue - I** **January - March - 2021**

**MARATHI PART - I**

## Peer Reviewed Refereed and UGC Listed Journal

**Journal No. 40776**

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

## IMPACT FACTOR / INDEXING

## 2019 - 6.399

**www.sjifactor.com**

## ❖ EDITOR ❖

**Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole**

M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

**❖ PUBLISHED BY ❖**

**Ajanta Prakashan**

Aurangabad. (M.S.)

The information and views expressed and the research content published in this journal, the sole responsibility lies entirely with the author(s) and does not reflect the official opinion of the Editorial Board, Advisory Committee and the Editor in Chief of the Journal **"AJANTA"**.
Owner, printer & publisher Vinay S. Hatole has printed this journal at Ajanta Computer and Printers, Jaisingpura, University Gate, Aurangabad, also Published the same at Aurangabad.

**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)
**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)
Cell No. : 9579260877, 9822620877, 7030308239 Ph. No. : (0240) 2400877

E-mail : ajanta6060@gmail.com, www.ajantaprakashan.com

**AJANTA - ISSN 2277 - 5730 - Impact Factor - 6.399** (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | महिला उद्योजकांचा निर्णय प्रक्रियेतील सहभाग (विशेष संदर्भ बीड तालुका)<br>**डॉ. सय्यद तनवीर बदरुद्दीन** | १-५ |
| २ | ग्रामीण भागातील स्त्रियांच्या आरोग्य विषयक समस्या<br>**प्रा. डॉ. एच. टी.सातपुते** | ६-९ |
| ३ | महिलांची सामाजिक स्थिती व महिलांच्या सक्षमीकरणासाठीच्या शासकीय योजना<br>**डॉ. विलास आबा गायकवाड** | १०-१३ |
| ४ | शेतीच्या विकासामध्ये स्त्रियांची भूमिका<br>**प्रा. डॉ. संजय मगर** | १४-१७ |
| ५ | महिला सबलीकरण - काळाची गरज<br>**प्रा. डॉ. देविदास विक्रम हारगिले** | १८-२५ |
| ६ | प्रबोधन काळात पती म्हणून सुधारक पुरुषांनी स्त्री सक्षमिकरणात निभावलेली भूमिका<br>**प्रा. डॉ. भाऊराव रामेश्वर तनपुरे** | २६-३० |
| ७ | भारतीय स्त्रियांचे राजकीय सक्षमीकरण<br>**प्रा. शहाणे रंजना प्रल्हादराव** | ३१-३४ |
| ८ | धर्मग्रंथातील महिलांचे अधिकार व समाज घडविणाऱ्या महिला<br>**डॉ. विश्वनाथ महादेव आवड** | ३५-३९ |
| ९ | महिला सक्षमीकरण काल, आज आणि उद्या<br>**डॉ. सतीश सांडू ठोंबरे** | ४०-४३ |
| १० | भारतातील महिला सुरक्षा : एक समाजशास्त्रीय अध्ययन<br>**प्रा. डॉ. दिपक राघोजी दामोदर** | ४४-४९ |
| ११ | मराठवाडा मुक्तीसंग्रामातील दगडाबाई शेळके यांचे योगदान<br>**प्रा. डॉ. संतोष रोहिदास पहारे** | ५०-५२ |
| १२ | संत जनाबाई यांचे अभंग आणि महिला सक्षमीकरण<br>**डॉ. विष्णू नामदेव लांडे** | ५३-५८ |
| १३ | भारतीय समाजातील स्त्रियांची बदलती स्थिती : सिंहावलोकन<br>**डॉ. मुरलीधर विठ्ठल हिरे** | ५९-६२ |

# CONTENTS OF MARATHI PART - I



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १४ | भारतीय अर्थव्यवस्था : स्त्री उद्योजकतेची भूमिका, समस्या आणि उपाययोजना<br>**डॉ. ए. एस. नलावडे** | ६३-६८ |
| १५ | महिलांचे सामाजिक, आर्थिक व राजकीय अधिकार<br>**प्रा. मनीषा महारुद्र गाडवे** | ६९-७२ |
| १६ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महिला आर्थिक सक्षमीकरणातील योगदान<br>**प्रा. डॉ. अमोल तुकाराम खाडे** | ७३-७६ |
| १७ | महिला लोकप्रतिनिधींचे राजकीय सक्षमीकरण : एक सामान्य अवलोकन<br>**डॉ. संतोष भिवसन काकडे** | ७७-८१ |
| १८ | महिला सक्षमीकरणात महिला श्रमशक्तीचा सहभाग<br>**डॉ. गजानन देवराव चिट्टेवाड** | ८२-८६ |
| १९ | कृषि आणि आर्थिक विकासामध्ये महिलांची भूमिका<br>**कु. नविता सुरेंद्र बल्लाळ** | ८७-९३ |
| २० | भारतीय महिलांचा राजकीय सहभाग व सबलीकरण<br>**डॉ. निलिमा राजाराम मिरजकर** | ९४-९८ |
| २१ | महिला सक्षमीकरण : समकालीन निकषांचे संदर्भ<br>**डॉ. भगवान सुरेश मनाळ** | ९९-१०६ |
| २२ | भारतीय स्त्रीयांचे मानसिक आरोग्य<br>**सुरेश श्रीनिवासजी मंत्री** | १०७-११६ |
| २३ | भारतीय संविधान आणि महिला सबलीकरण<br>**शेख उजमा खलील** | ११७-१२२ |
| २४ | स्थानिक स्वराज्य संस्था आणि महिला सक्षमीकरण<br>**डॉ. बबन आमले** | १२३-१२५ |
| २५ | महिला सक्षमीकरणात मानवाधीकार कायद्याची भूमिका<br>**प्रा. डॉ. दिलीप नि. लांजेवार** | १२६-१३० |
| २६ | महिला सक्षमीकरनामध्ये बचत गटाची भूमिका<br>**प्रा. दत्तात्रय प्रभुराव मुंढे** | १३१-१३४ |

# CONTENTS OF MARATHI PART - I



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २७ | महिला सबलीकरणात महिला स्वयंसहाय्यता बचत गटाची भूमिका<br>**डॉ. नानासाहेब भाऊसाहेब दाभाडे** | १३५-१४१ |
| २८ | महिलांच्या सक्षमीकरणामध्ये बचत गटांची भूमिका<br>**प्रा. डॉ. सौ. रागिणी पाध्ये** | १४२-१४४ |
| २९ | स्त्री व समाज<br>**प्रा. डॉ. अनिल डी. पवार** | १४५-१४८ |
| ३० | महिला सक्षमीकरण बचत गटाची भुमिका<br>**डॉ. जयश्री आसाराम तळेकर** | १४९-१५१ |
| ३१ | भारतीय संविधान आणि महिला सबलीकरण : एक प्रशासकीय अभ्यास<br>**डॉ. संजय किशनराव भालेराव** | १५२-१५६ |
| ३२ | शोषणमुक्ती आणि सर्वांगिण विकासासाठी स्त्रीयांचे मानसिक सक्षमीकरण<br>**स्टिफन इग्नेशिअस आल्मेडा** | १५७-१६४ |
| ३३ | स्त्री-पुरूष शारिरिक आणि सांस्कृतिक लिंगभेद व त्यांचे परिणाम अभ्यासणे<br>**डॉ. जाधव रामदास काळू** | १६५-१६८ |
| ३४ | इतिहासातील दुर्लक्षित महिला ''आशाताई आनंदराव वाघमारे''<br>**प्रा. डॉ. कालिदास दिनकर फड** | १६९-१७० |
| ३५ | भारतातील स्त्रीया आणि राजकारण<br>**कु. कोमल जादुगर बनकर** | १७१-१७३ |

VOLUME - X, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2021
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)** CC-2

# ८. धर्मग्रंथातील महिलांचे अधिकार व समाज घडविणाऱ्या महिला

**डॉ. विश्वनाथ महादेव आवड**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख, शंकरराव मोहिते महाविद्यालय अकलूज.

**प्रस्तावना**

२६ जानेवारी १९५० साली आमलात आलेल्या भारतीय राज्यघटनेने मुलभूत अधिकार देत असताना धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान या कारणावरून भेदभाव होणार नाही. याची शास्वती देवून स्त्रि पुरूषांना समान अधिकार दिलेले आहेत. १९५६ साली हिंदू वारसा हक्क कायदानुसार अविवाहीत मुलींनाही वारसा हक्क मिळत गेलेले दिसतात. सप्टेंबर २००५ च्या कायदयानुसार हिंदू कुटुंबातील मालमत्तेचा अधिकार मिळाला. १४ ऑगष्ठ २०१४ च्या मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपिठाने २००५ च्या नंतर व आगोदरच्या सर्व जन्मलेल्या प्रत्येक स्त्रिचा वारसा हक्क मान्य केलेला आहे.

एकंदरीत आपल्या आयुष्याचा अविभाज्य भाग असणारी स्त्रि ...ती, आई, बहिण, पत्नी, मुलगी, आत्या, मावशी, काकी, आजी, पणजी, मैत्रीण अशा वेगवेगळ्या रूपात वावरत आहे. संधी मिळालीच तर पुरूषांनाही लाजवेल अशि कामगिरी करून दाखविलेली आहे. राजकीय, सामाजीक, आर्थीक, शैक्षिणिक अशा कोणत्याही क्षेत्रात स्त्रिया कुठेही कमी पडत नाहीत. परंतु सामाजीक अधिकारांचा विचार करता स्त्रियांच्या अधिकाराचा पदर हा धार्मीक विचारांमध्ये गुरफटलेला दिसतो. त्यातुनच त्यांना हिन, कमी लेखले गेले. या संशोधन पेपर मध्ये स्त्रियांच्या अधिकाराबाबतचे प्राचीन संदर्भातून त्यांना वेगवेगळ्या क्षेत्रात असलेल्या अधिकार समानतेचे होते याची मांडणी केलेली आहे.

**साधने**

प्रस्तुत पेपरची मांडणी करताना दुय्यम साधनांचा वापर केलेला आहे त्यामध्ये धर्मग्रंथ, विविध विचारवंताचे संदर्भग्रंथ, प्रस्तूत विषयावरील विविध पुस्तके तसेच वर्तमान पत्रातील लेख, इंटरनेटवीरल माहीतीचा वापर केलेला आहे.

**विषय मांडणी**

महिलांना विशेष अधिकार वेदकालापासूनच होते हि मांडणी करताना काही धर्मग्रंथातील रूचांचा / सुक्तांचा आधार घेतलेला आहे.

प्राचीन ग्रंथानी स्त्रियांना वागविताना विशेष अधिकार दिलेले होते...

१. शतपत ब्राम्हण (११.४.३.२)

स्त्री वाऽएषा यच्छ्रिर्न वै स्त्रियों घ्नन्त्युत त्वा अस्या

जीवन्त्या एवाददीत इति॥

( कोणत्याही कारणाकरीता स्त्रीयांचा वध करू नये )

२. महाभारत आदिपर्व (१५८.३१)

अवधिया स्त्रियों इत्याहुर्धर्माज्ञा धर्मनिश्चये।

ज्यांना धर्म माहीत आहे त्यांना स्त्रिया अवध्य आहेत हे समजते

३. महाभारत सभापर्व (४१.१३ )

स्त्रिषु गोरु न शस्त्राणि पातयेद ब्राम्हणेचु

यस्य चान्नानि भुज्जित यत्र च स्वातप्रतिश्रयः ॥

कोणतेही शस्त्र स्त्रिया, गाई, ब्राम्हण व जिवानदान दिलेल्या उपकारकर्त्यावर उगारू नये.

४. याज्ञवल्क्य स्मृती ( २.३१) व नारद रूणादान (२६.३७१)

स्त्रिया कडून लिहून घेतलेले दस्तऐवज अथवा दान विक्री गहाण यांच्यासारखे व्यावहार बळजबरिने किंवा फसवून केलेल्या विवाहा प्रमाणेच व्यर्थ स्वरूपाचे ठरविता येतात.

५. गौतमसुत्र (६.२१/२२) रस्त्यावरून चालताना स्त्रियांना इतरापेक्षा पुढे चालण्याचा अधिकार असे.

६. देवलस्मृती (३०) कर्मलोपाबद्दल स्त्रियांना करावे लागणारे प्रायश्चित पुरूषांच्या निम्मे असते

७. अथर्ववेद १४ वा कांडातील १ ल्या विवाह प्रकरणात ६३ वी रूचा वधूला वेद पारंगत होण्यासाठी ज्ञानी, निरोगी राहण्यासाठी आशिर्वादपर वचन देत आहे

ब्रम्हापरं पुज्यता ब्रम्हपुर्व ब्रम्हान्ततो मध्यतो ब्रम्ह सर्वतः ।

अनाव्याध्या देवपुरा प्रपद्य शिवा स्योना पतीलोके विराज ॥

(हे वधू तू मागे पुढे मध्ये शेवटी ,सर्व बाजुनी वेद विषयक ज्ञान असु दे वेदज्ञान प्राप्त करून तदनुसार तू आपले जीवन व्यतीत कर मंगलमयी, सुखदायीनी आणि स्वास्थ निरोगी होवून तू आपल्या पतीच्या घरी विराजमान हो आणि स्वस्थ सदगुणांनी प्रकाशमान हो )

८. यमस्मृतीमध्ये एका ठिकाणी उल्लेख आहे कि प्राचीन काळी स्त्रियांना मौजीबधन ः वेद शिकणे गायत्री मंत्र म्हणणे इष्ट समजले जात असे.

पुराकल्पे तु नारीणां मौजीबंधनमिष्यते ल्अध्य्

प्राचीन भारतीय धर्मग्रंथामध्ये असे अनेक अधिकार महिलांना दिलेले होते. केवळ अधिकारच दिलेले नव्हते तर अनेक धर्मग्रंथाची निर्मीती करण्यातही महिलांचे योगदान होते. रूग्वेदामध्ये रोमशा, लोपामुद्रा, अदिती, विश्ववारा अत्रैयी, अपला अत्रैयी, शस्वती अंगिरसी, अगस्त्य स्वसा, इंद्रमातृ, इंद्रस्नुषा, शची इंद्राणी, उर्वशी, गोधा, घोषा काक्षिवती, जुहू ब्रम्हजाया ब्रम्ह, दक्षिणा प्रजापत्या, यमी वैवस्वत, काशिपा भारव्दाज दुहिता, सरस्वती, सविता, नद्य, शची पौलोमी, शिखंडिनी, सार्पराज्ञि, सुर्या सावित्री, सरमा देवशुनी, श्रध्दा कामायनी, सिकता तिवावरी, जरितृ शार्ङग या २८ व याशिवाय सत्ययुगातही अनेक महिलांचा उल्लेख येतो ज्यांनी रूग्वेदातील रूचा, सुक्ते लिहलेली आहेत.

उपनिषद काळातही गार्गी मैत्रेयी, देवहुती, अरुंधती, चुडाला, मदालसा, जया आणि सुप्रभा हि नावे येतात ज्यांनी अनेक सुक्ते, रूचा लिहून धर्मग्रंथाना समृध्द करण्याचा प्रयत्न केला.

रामायण महाभारतकालीन कौशल्या, कैकयी, अंजनी, सीता, शबरी, मंदोदरी, केतकी, सत्यभामा, ईत्यादी स्त्रियांचे राजकिय व अध्यात्मीक ज्ञान अधोरेखीतच आहे.

ऐतरीय ब्राम्हण ग्रंथात स्त्रियांना सुखा ह जाया म्हणजेच पत्नीलाच मित्र / मैत्रीण म्हटलेले आहे. पतीला सौभाग्य प्राप्त व्हावे यासाठीच तो पत्नीचा उल्लेख सौभाग्यवती असा करीत असतो.

व्याकरण शास्त्रामध्येही स्त्रियांचा शिक्षक असण्याचा उल्लेख आलेला आहे.

पाणिनीच्या अष्टाध्यायी ४/३/२/४९ मध्ये म्हटले आहे कि जी स्त्री अचार्यत्व करणारी आहे तीला अचार्य असे स्पष्ट नाव दिलेले आहे.

स्पाणिनीय : अचार्यस्य स्त्री आचार्यानी पुंयोगः इत्येव आचार्य स्वयं व्याख्यायी

बौध्द परंपरेत मुळ ग्रंथ त्रिपिटक त्यातील शुद्रापिटकाच्या खुददकनिकाय मधील ९ व्या ग्रंथातील थेरीगाथा हा ग्रंथ (थेरी म्हणजे अनुभवी, ज्ञानी स्त्री) अशा ७३ थेरींनी तात्कालीन समाजातील चुकीच्या प्रथा परंपरा दुखाला कशा कारणीभुत आहेत याबाबत विचार मांडले आहे. यामध्ये यशोधरा, सुप्रिया, सुजाता, आम्रपाली, धर्मदिन्ना, महाप्रजापती गौतमी, चंद्रा, सोना, विमला, सोमा, आपराउत्तमा, संघा, अभयमाता, उब्बिरी, मित्ता, तिसा गौतमी, चित्ता, प्रकृति चांडालीका, अर्धकासी, अभिरूपनंदा, सुमंगलमाता, खेमा, जन्मी, चित्रा, शुभा, शीला, मघा, रोहिणी, सुमेधा, विशाखा, भद्राकुंडलकेशा, पटाचारा यांचा उल्लेख येतो

जैन पंरपरेमध्ये १६ महिला प्रातः स्मरणिय मानलेल्या आहेत राजमती, वसुमती चंदऩबाला, रूपसुंदरी यांनिही लोकांना सन्मार्ग शिकविला.

मध्ययुगात विमला देवी अक्कमहादेवी, महदअंबिका, मुक्ताई, महदाइसा, संत मुक्ताई, जनाबाई, गोणाई, राजाई, आऊबाई, लिंबाई, लाडाई, संत सोयाराबाई, निर्मळा, संत सुळे संक्कवा, कान्होपात्रा, मीराबाई, लल्लेश्वरी, बहिणाबाई, भागूबाई, वेणाबाई, अक्कास्वामी, अंबिकाबाई, संताबाई, सखूबाई, माता शारदादेवी या संतपरंपरेतील महिलांनी अध्यात्म, सामाजीक ईत्यादी क्षेत्रातील आपल्या कार्याने समाजाला वेगळी दिशा दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे.

राजमाता जिजाऊ, महाराणी ताराराणी अधुनिक काळात सावित्रीबाई फुले यांचे पासून ते मुक्ता साळवे, रमाबाई रानडे, कृष्णाबाई केळवकर, काशिबाई कानिटकर, काशिबाई हेर्लेकर, दुर्गा खाडिलकर, गंगूबाई खेडकर,पहिल्या महिला डॉक्टर डॉ रखमाबाई राऊत, पुण्यातील पहिल्या महिला वकिल चंद्राबाई पोक्षे, पहिल्या शंकरशेट शिष्यवृत्तीच्या मानकरी राजूबाई शहा, ऑक्सफर्ड डि लिट मिळविणारया सीताबाई परमानंद, प्रांतीक महिला कॉग्रेसच्या पहिल्या अध्यक्षा अनुसयाबाई काळे... भारतीय राज्यघटना समितीत कार्य केलेल्या सरोजिनी नायडू, विजयालक्ष्मी पंडित, बेगम रसूल, दुर्गाबाई देशमुख, हंसा मेहता आणि रेणूका रे या प्रथितयश महिला. मराठी साहित्यातल्या दुर्गाबाई भागवत, शांता शेळके, सरोजिनी बाबर, अशा अनेक.

अलीकडील काळातील सुधामुर्ती अनुताई वाघ, सिंधुताई सपकाळ, डॉ राणि बंग, मेघाताई पाटकर, पिटी उषा सायना, पि व्ही सिंधू .कारनाम मल्लेश्वरी.. निला सत्यनारायण, इंदिरा गांधी याचे पासून ते सुषमा स्वराज्य व सोनीया गांधी ते निर्मला सितारामन, संगीत क्षेत्रातील शोभा गोर्टू ते देवकी पंडीत पद्मजा फेणानी ते मंगेशकर भगिनी.

या व अशा अनेक महिलांनी आपल्या बुध्दीमत्तेने, कार्याने, समाज धडणीत व समाज बांधणीत अध्यात्मीक, राजकिय, सामाजीक, साहित्य, विज्ञान, क्रीडा, उद्योग, संगीत, व्यवसाय, शेती, प्रशासन, ईत्यादी ठिकाणी कार्य करणारया महत्वाची भुमीका बजावलेली आहे.

**निष्कर्ष**

वरील विविध ग्रंथातील मांडणी व संकल्पना लक्षात घेतली असता काही महत्वाचे निष्कर्ष निघतात ते पुढीलप्रमाणे ...

१. वेद अपौरूषीय नाहीत.

२. सिध्दांन्त कौमुदी या ग्रंथावर टीका करताना पंडित शिवदत्त शर्मा म्हणतात कि स्त्रीयांना वेदाध्ययन न करण्याचे किंवा वेदाधिकारी न होण्याविषयीची बंधने कुठेही नाहीत।

३. वेदामध्ये असे कितीतरी मंत्र आहेत जे केवळ स्त्रियांनीच उच्चार करावयाचे आहेत. उदा. शची पैलोमीने रचलेल्या रूग्वेदातील १० व्या मंडलातील १५९ सुक्तातील १ ते ३ रूचा.

४. अनेक महिलांनी आपल्या बुध्दीमत्तेने, कार्याने, समाज धडणीत व समाज बांधणीत अध्यात्मीक, राजकिय, सामाजीक, साहित्य, विज्ञान, क्रीडा, उद्योग, संगीत, व्यवसाय, शेती, प्रशासन ईत्यादी ठिकाणी कार्य करणारया महत्वाची भुमीका बजावलेली आहे.

५. विसावे शतक हे स्त्रियांच्या उत्थापनाचे शतक होते. सर्वच क्षेत्रांत स्त्रीशिक्षणासाठीचे प्रयत्न व शिक्षणाचा विकास ऊर्ध्वगामी झालेला दिसतो पण अजूनही भारतात शिक्षित स्त्रिया पुरुषांच्या तुलनेत अल्पसंख्य आहेत. स्त्रीला एकविसाव्या शतकाच्या पूर्वार्धात सबल पंख लाभत आहेत. स्त्रियांच्या म्हणून खास समजल्या जाणाऱ्या नोकऱ्यांकडून वैमानिक, संशोधिका, शास्त्रज्ञ, डॉक्टर, अभियंता, संगणकतज्ञ,पोलिस अधिकारी, व्यवस्थापक, संपादक, उद्योजक, प्रशासक अशा एरवी स्त्रियांना खुल्या नसणाऱ्या व स्पर्धात्मक जगात सत्ता हाती असणाऱ्या महत्त्वाच्या स्थानांवरही स्त्रियांचा हळूहळू प्रवेश होऊ लागला आहे. स्त्रीशिक्षणाने तिला आपली उन्नती करण्याची ऊर्जा दिली असून त्यांना पुरुषांइतकाच अधिकार प्राप्त झाला आहे. जेव्हा खेड्यांतील आणि दुर्गम भागांतील प्रत्येक मुलगी शिक्षित झालेली असेल, तेव्हा भारताची नोंद विकसनशील देश अशी न राहता विकसित देश अशी होईल. भूतपूर्व राष्ट्रपती अब्दुल कलाम यांनी २०२० पर्यंत भारत एक महासत्ता बनण्याचे पाहिलेले स्वप्न पूर्ण होण्यासाठी प्रत्येक भारतीयाने स्त्रीशिक्षणास अग्रक्रम दिला पाहिजे.

संदर्भ साधने

१. **वेदांच्या वेदीवलन** : **ॲड शंकर निकम**

२. **प्राचीन काळातील महिलांचे स्थान** : **डॉ साहेबराव निगळ**

३. **संस्कार वेध** : **ॲड शंकर निकम**

४. **मराठी विश्वकोश** : **स्त्रीशिक्षण**

५. Agrawal, S. P. Women's Education in India, 3 Vols., New Delhi, 2001.

६. Altekar, A. S. The Position of Women in Hindu Civilization, Banaras, 1938.

७. Madhavanand, Swami Majumdar, R. C. Eds., Great Women of India, Almora, 1953.

८. बाबर, सरोजिनी, स्त्री-शिक्षणाची वाटचाल, मुंबई, १९६८.